*Akshardhara Research Journal*
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
*E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume I*

**23**

# राजकीय नेतृत्व व आपत्ती व्यवस्थापन विशेष संदर्भ – पंतप्रधान नरेंद्र मोदी

**डॉ. शरद मधुकर कुळकर्णी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
गं. ए. ट्र चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगाव, ता. ता धुळे

---

**प्रस्तावना-**

नेतृत्वाची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. राजकीय नेतृत्वाची आपत्ती व्यवस्थापनामधिल भूमिका अधिकारी वर्गावर प्रभाव निर्माण करते. राजकीय नेतृत्वाचे संघटन कौशल्य अधिक असल्यास तो आपल्या अनुयायांच्या माध्यमातून व अनुयायांच्या मदतीने आपत्तीवर नियंत्रण मिळवू शकतो. आपत्तीत सापडलेल्या जनतेला वाचवू शकतो, त्यांना मदत करु शकतो. स्वतःच्या प्राणाकडे न पाहता आपत्तीमध्ये सापडलेल्यांना मदत करणे, स्वतःच्या सुखाचा त्याग करून दुसऱ्याचा जीव वाचविण्याची प्रवृत्ती राजकीय नेत्यामध्ये असली तर असा नेता चांगल्या प्रकारे आपत्ती व्यवस्थापन कर शकतो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे असे एक नेतृत्व आहे की त्यांनी आपल्या तरुणपणापासून आपत्तीमध्ये सापडलेल्या लोकांना मदत करण्यासाठी आपला वेळ खर्च करुन, प्रसंगी संकटात धोका पत्करून आपत्ती निवारण्यासाठी कार्य केले आहे. भूकंप, महापूर, दहशतवादी हल्ले असो कोविड १९ सारखी जागतीक महामारी असो.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य प्रभावीपणे केल्याचे दिसून येते. या शोध निबंधात राजकीय नेतृत्वाची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका मांडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आपत्ती व्यवस्थापना मधिल भूमिका नेमकी कशी आहे, हे एक केस स्टडी म्हणून अभ्यासली आहे.

**उद्देशः** राजकीय नेतृत्वाची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका शोधाणे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका अभ्यासणे.

**गृहीतक :-** राजकीय नेतृत्वाची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका महत्त्वाची असते. नरेंद्र मोदी यांनीही आपत्ती व्यवस्थापनात खूप चांगली भूमिका बजावली आहे.

**विश्लेषण-** आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी, वित्तहानी होत असते. मानवी जीवनाची जीवनपध्दती बदलविणारी आपत्ती नैसर्गिक स्वरुपाची किंवा मानवी स्वरुपाची असू शकते. मानव व इतर जीवांवर अचानक आलेले मोठे संकट,वाईट घटना महणजेच आपत्ती होय.यात बॉम्ब स्फोट, युध्द, महापूर, भूकंप, आग, वादळ , विज कोसळणे, रोगराई अवर्षण, जलप्रलय, वायु गळती,ज्वालामुखीच उद्रेक आशा घटनांचा समावेश होतो.आशा आपत्तीकारक घटना थांबविणे किंवा त्या आपत्तीचे नियंत्रण, व्यवस्थापन करणे जरुरीचे असते.व्यवस्थापन केल्यास आपत्तीची तीव्रता कमी होऊन जीवितहानी टाळता येते,निदान कमी तरी करता येते. व्यवस्थापन या शब्दाचा उपयोग दोन अर्थाने होत असतो. त्यातील पहिला अर्थ व्यवसाय संघटनेतील उच्च पातळीवरील अधिकारी किंवा त्यांच्या समुहाशी असतो.त्यामध्ये व्यवस्थापक, संचालक आणि निरनिराळ्या विभाग प्रमुखांचा समावेश असतो. या ठिकाणी व्यवस्थापन या शब्दाचा अर्थ समुहवाचक दर्शविला जातो.व्यवस्थापनाच्या दुसऱ्या अर्थामध्ये व्यवस्थापन करण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या सर्व कार्याचा समावेश असतो. त्यामध्ये उत्पादनासंबंधी मार्गदर्शन ,नियोजन, नियंत्रण आणि समन्वय या कार्याचा समावेश असतो. सर्व प्रकारच्या कार्याचे एकत्रीरित्या व्यवस्थापन यामध्ये असते.संस्था किंवा कारखाना उत्कृष्टपणे कार्यक्षम होण्यासाठी उत्कृष्ठ व्यवस्थापनाची आवश्यकता असते.[१] विविध अभ्यासकांनी व्यवस्थापनाच्या व्याख्या केलेल्या आहेत.हेन्री फेयोल (1916): "व्यवस्थापन म्हणजे अंदाज बांधणे आणि योजना करणे, संघटित करणे, आदेश देणे, समन्वय करणे आणि नियंत्रण करणे." मेरी पार्कर फोलेट (1926): "व्यवस्थापन म्हणजे लोकांद्वारे कामे करून घेण्याची कला."

हॅरोल्ड कोंट्झ आणि सिरिल ओ'डोनेल (1955): "व्यवस्थापन ही संस्था सदस्यांच्या प्रयत्नांचे नियोजन,संघटन,नेतृत्व आणि नियंत्रण करण्याची प्रक्रिया आहे." वरील व्याख्याचा विचार करता व्यवस्थापनाचा अर्थ पटकन लक्षात येतो. आपत्ती व्यवस्थापनामध्ये आपत्तीचा सामना करण्याची क्षमता प्राप्त करणे, त्या क्षमतेत वाढ करणे, त्यासाठी प्रतिबंधात्मक योजना आखणे, आपत्तीचे निवारण तसेच आपतकालीन व्यक्तीचे पुनर्वसन, पुनर्निर्माण इत्यादी घटकांचा विचार करुन कृती आराखडा करणे, योग्य सूत्रसंचालन करुन कमीत कमी वेळात मानसिक स्थैर्यता मिळवणे अपेक्षित असते.

आपत्ती व्यवस्थापनातील नेतृत्वाची भूमिका पाहण्यापूर्वी नेतृत्वाची व्याख्या पाहू या. वॉरेन बेनिस (1959)_: "नेतृत्व ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे एखादी व्यक्ती इतरांना कृती करण्यास प्रवृत्त करते."[२]

डगलस मॅकग्रेगर (1960): "नेतृत्व म्हणजे इतरांच्या कृतींवर प्रभाव टाकण्याची क्षमता."[3]

राल्प स्टोगडील(1974): "नेतृत्व म्हणजे ध्येय साध्य करण्यासाठी संघटित गटाच्या क्रियाकलापांवर प्रभाव टाकण्याची प्रक्रिया."[४]

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume I

आपत्ती व्यवस्थापनामध्ये नियोजन करणे आणि त्या नियोजनाची अंमलबजावणी करणे महत्त्वाची असते. निरनिराळ्या कार्याची अंमलबजावणी करताना नेतृत्त्वास त्या परिसरातील व्यक्तींना योग्य मार्गदर्शन करावे लागते,सूचना द्याव्या लागतात आणि त्यांचेकडून आपत्ती नियंत्रण करून घेतले जाते. आपत्ती व्यवस्थापनात उत्कृष्ठ नेतृत्त्व लाभले तरच आपत्तीवर नियंत्रण मिळविता येते. नेतृत्त्वाच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे आणि योग्य संचालनामुळे सर्वांची कार्यक्षमता वाढते. तसचे आपत्तीच्या विविध कार्यात एकसूत्रता निर्माण होते.सर्वांचे सहकार्य लाभते,सर्वांना प्रेरणा मिळते,आपत्तीग्रस्तांचे हित जोपासले जाते. आपत्ती पुन्हा उद्भवणार नाही याविषयी खबरदारी घेतली जाते. तसेच तात्पुरते निर्माण होणारे संघर्ष टळतात आणि कार्यामध्ये अपेक्षित यश मिळते.[१] स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षांमध्ये व नंतरही आपत्ती व्यवस्थापनाबाबत कायदा नव्हता. २००१मध्ये राज्य आपत्ती व्यवस्थापन कायदा आणणारे गुजरात हे पहिले राज्य होते. तत्कालीन केंद्र सरकारने या कायद्याच्या आधारे आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ लागू केला. त्यानंतर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अस्तित्वात आले.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका**

वरील विवेचनावरून आपत्ती म्हणजे काय ? नेतृत्वाचा अर्थ आणि त्याच्या भूमिकेचे महत्व समजण्यास मदत होते.आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका नेमकी कशी आहे ही पाहू या. नरेंद्र मोदी यांनी आपल्या तरुणपणापासून समाज सेवेचे व्रत घेतले होते असे दिसते. तरुण असतांना त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात प्रवेश केला आणि संघ कार्य करू लागले. १९७९ मध्ये गुजरात मधील राजकोट जिल्ह्यात ढग फूटी सारखा पाऊस पडला. यावेळी मच्छू नदीवरमोरबी येथे बांधलेले धरण फुटून मोठी जीवित हानी झाली . यावेळी नरेंद्र मोदी मदत कार्यासाठी धाऊन गेले. मोरबी हे मच्छू नदीच्या काठावर वसलेले लहानसे शहर आहे.ऐतिहासिकदृष्ट्या या शहराची वेगळी ओळख असली तरी भौगोलिकदृष्ट्याही ते महत्त्वाचे आहे. हे गुजरातमधील एक क्षेत्र मानले जाते. जेथे पावसाचे प्रमाण जास्त असते. नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारताला विकासासाठी व पाणि पुरवठ्यासाठी धरण बाधण्याची गरज होती.१९५९ मध्ये मच्छू नदीवर या प्रदेशाची नैसर्गिक वैशिष्ट्ये लक्षात घेऊन धरण बांधण्यात आले. स्थानिक सिंचन व्यवस्थेला आधार देण्यासाठी हे धरण बांधण्यात आले. मच्छू-II, दुसरे धरण, काही वर्षांनंतर १९७२ मध्ये मच्छू-२ (दुसरे धरण) बांधण्यात आले. पहिल्या धरणाच्या तुलनेत हे धरण बऱ्यापैकी मोठे होते.हे धरण बांधल्यानंतर, ११ ऑगस्ट १९७९ रोजी एक भयानक दुर्घटना घडेपर्यंत अनेक वर्षे सर्वकाही सुरळीत चालले. सौराष्ट्रातील राजकोट जिल्ह्यात पावसाळ्यात भरपूर पाऊस झाला; मोरबीलाही याचा फटका बसला. धरणाजवळ राहणाऱ्या मोरबी ग्रामस्थांना हे माहीत नव्हते की, नव्याने बांधलेल्या सिंचन धरणासाठी पाण्याचा वाढलेला दाब खूप जास्त असेल. ११ ऑगस्ट रोजी मच्छू-२ धरण काही मिनिटांतच फुटले.या आपत्तीच्या काळात, अनेक सामाजिक संस्थांनी मदत कार्य केले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा या सामाजिक संस्थांपैकी एक होता. आपत्तीचे वृत्त कळल्यापासून संघाचे कार्यकर्ते पीडित आणि गरिबांच्या मदतीसाठी तेथे पोहचले व मदत कार्य करू लागले. त्यावेळी वरिष्ठ नेतृत्व लक्ष्मणराव इनामदार,केशवराव देशमुख, प्रवीणभाई मणियार आणि केशुभाई पटेल यांनी हजारो समजसेवकांसोबत काम केले. यात एक नाव होते ते २९ वर्षीय राष्ट्रीय स्वयंसेवक नरेंद्र मोदी यांचे. त्यानी सुमारे ५० दिवस तेथे राहून लोकांचे प्राण वाचविण्यासाठी प्रयत्न केले. काही प्रेत चिखलात, गाळात होते, ते सडून गेले होते. तरी नरेंद्र मोदी यांनी प्रेत काढून अंत्यसंस्कार केले. मोरबीमध्ये ही भीषण आपत्ती आली तेव्हा ते केरळमध्ये होते.ही भयंकर घटना घडल्यावर ते मदतीसाठी येवून पोहचले. तिथली परिस्थिती लक्षात घेऊन मोदींनी सखोल आराखडा तयार केला आणि कार्यास सुरुवात केली. गुजरात सरकार कारवाई करण्यास आणि गरजूंना मदत देण्यास तयार होण्यापूर्वीच मोदींचे कार्य सुरू झाले होते.

३० सप्टेंबर १९७९ रोजी प्रकाशित झालेल्या टाइम्स ऑफ इंडियाच्या बातमीनुसार, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पूर आपत्ती निवारण समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीने पूरग्रस्तांसाठी घरे बांधण्यासाठी लाखों रुपये जमा केले.[५] मोदींचा आपत्ती व्यवस्थापनाचा पहिला अनुभव व कार्य पूरग्रस्त मोरबीमध्ये गाळ आणि जनावरांच्या प्रतांना बाहेर काढण्याच होता. ही २९ वर्षीय मोदींची प्रेरणादायी कथा फारशी ज्ञात नाही. परंतु या अनुभवाने भविष्यातील पंतप्रधानांनी देशाला लवचिक बनवण्यासाठी आणि अनपेक्षित आपत्तींसाठी तयार केलेल्या संकल्पाची सुरुवात म्हणून चिन्हांकित केले. मोरबी आपत्ती, ज्याला गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्सने जगातील "सर्वात वाईट धरण फुटले" म्हणून संबोधले होते, त्यात सुमारे २०००० लोकांचा मृत्यू झाला. स्वातंत्र्यानंतर तीन दशकांहून अधिक काळानंतर हे घडले असले तरी, अशा प्रतिकूल घटनांचा अंदाज लावण्यासाठी किंवा त्यांना प्रतिसाद देण्यासाठी भारताकडे कोणतीही यंत्रणा नव्हती. मोदींनी सतत ५० दिवस वैयक्तिकरित्या मदत कार्य केले.तसेच घरांच्या पुनर्बांधणीसाठी आणि इतर जीर्णोद्धार कामांसाठी २० लाख (त्यावेळी मोठी रक्कम)लोक वर्गानीतून जमा करून दिली. एका भागात, एक मृतदेह विशेषतः असह्य पद्धतीने गाळात अडकला होता. इतर लोक मार्ग शोधण्यासाठी धडपडत असताना, नरेंद्र मोदींनी ते बाहेर काढण्यात यश मिळवले. त्यांनी तेव्हा असे सुचवले की मृतदेह कापडात गुंडाळून बाहेर काढल्यास वर खेचताना किंवा उचलताना त्यांचे तुकडे

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume I

होणार नाही. हा उपयुक्त, व्यावहारिक सल्ला सर्वांना मान्य झाला.यावेळी मोदींनी त्यांच्या वैयक्तिक संबंधांचा वापर करून कुशल बांधकाम कामगार, सुतार,इलेक्ट्रिशियन, तंत्रज्ञ आणि प्लंबर गोळा करून नुकसान झालेल्या भागांची पुनर्बांधणी करण्यासाठी खूप प्रयत्न केल्याचे दिसते.तसेच मोरबी मध्ये सडलेल्या प्रेतांमुळे साथीचे आजार पसरू नये यासाठी प्रयत्न केले. बचाव कार्याचे नेतृत्व करण्यापासून ते पुनर्बांधणीच्या उपाययोजना सुरू करण्यापर्यंत, या मोरबी दुर्घटनेने तरुण नरेंद्र मोदींच्या मनात आपत्ती व्यवस्थापन सुधारणांची बीजे रोवली गेली असे दिसते.[६] तसेच त्यांचा प्रत्येक संकटाचे चांगल्या संधीत रूपांतर करण्याचा अनमोल व्यक्तिमत्वाचा गुण इथेच विकसित झाला असावा,असे वाटते.पुढे जेव्हा ते गुजरातचे मुख्यमंत्री बनले तेव्हा नरेंद्र मोदींनी भूकंपाने उद्ध्वस्त झालेल्या कच्छच्या पुनर्विकासाचे नेतृत्व करून कामे विक्रमी वेगाने केले. भुज भूकंपमुळे किती हानी झाली होती हे संशोधकाने प्रत्यक्ष पहिले आहे. [भुज मध्ये भूकंप झाल्यावर जळगावाचे आमदार सुरेशदादा जैन यानी जैन संघाच्या माध्यमातून भुज विभागात २८ शाळांचे बांधकाम पूर्ण करून दिले.महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी या भुज विभागात बांधलेल्या शाळांचे लोकार्पण केले होते.यावेळी संशोधक प्रा.शरद कुळकर्णी या कार्यक्रमाला दैनिक जनशक्तीचे प्रतिनिधि म्हणून उपस्थित होते.]पुढील काळात नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी भूकंप ग्रस्त लोकांच्या समस्या सोडविण्यावर भर दिला. २०२० मध्ये कोविड १९ महामारीची आपत्ती आली . या प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान या नात्याने आपत्ती व्यवस्थापन उत्तम रीतीने केले.तसेच आपत्ती व्यवस्थापनासाठी दहा कलमी मार्गदर्शन केले आहे.आज भारत संपूर्ण विश्वात कुठेही आपत्ति आली तरी मदतीसाठी हात पुढे करतो. भारत जगभरात येणाऱ्या आपत्तींना त्वरित प्रतिसाद देतो आणि लवचिक पायाभूत सुविधांसाठी देखील प्रतिसाद देतो आणि पुढाकार घेतो. भारताच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांसाठी जगातील १०० हून अधिक देश सामील झाले आहेत.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आपत्ति व्यवस्थापनावर मार्गदर्शनपर विचार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपत्ति व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शनपर विचार मांडले आहेत. ते म्हणतात की ,'आम्हाला संस्थात्मक नियोजन करावे लागेल आणि स्थानिक नियोजनाचा आढावा घ्यावा लागेल. प्रथम, आपत्ती व्यवस्थापन तज्ञांना लोकसहभागावर अधिक भर द्यावा लागेल. भूकंप, चक्रीवादळ, आग आणि इतर आपत्तींच्या धोक्यांबद्दल लोकांना जागरूक करण्याच्या सतत प्रक्रिया करावी लागेल. यासंदर्भात योग्य प्रक्रिया, ड्रिल आणि नियमांबाबत जनजागृती करणे महत्त्वाचे आहे. स्थानिक सहभागाने घ्यावा लागेल. स्थानिक प्रशिक्षित 'युवक मंडळे' आणि 'सखी मंडळे' गाव आणि आसपासच्या स्तरावर मदतीसाठी घेतले पाहिजे. त्यांनी आपदा मित्र, NSS-NCC, लष्करातील दिग्गजांची यंत्रणा अधिक मजबूत करण्यास सांगितले आणि प्रथम प्रतिसादासाठी समुदाय केंद्रांमध्ये उपकरणे सुनिश्चित करणे आवश्यक आहे कारण बचाव कार्य वेळेवर सुरू केल्याने अनेकांचे जीव वाचू शकतात.असे सांगितले. दुसऱ्या स्तरावर, पंतप्रधानांनी तंत्रज्ञानाचा वापर करून रिअल टाईम नोंदणी आणि देखरेख प्रणाली वापरण्याची सूचना केली. ते म्हणाले, "घरांचे वय, ड्रेनेज, आमची वीज आणि पाण्याची पायाभूत सुविधा यासारख्या पैलूंवरील लोकांना ज्ञान दिले पाहिजे. विशेषत: वाढत्या उष्णतेमुळे गेल्या काही वर्षांत रुग्णालय, कारखाना, हॉटेल किंवा बहुमजली निवासी इमारतींसारख्या दाट शहरी भागात आगीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले. त्यांनी दाट लोकवस्तीच्या भागात अतिशय पद्धतशीरपणे काम करण्याची आव्हाने अधोरेखित केली जिथे वाहनाने पोहोचणे कठीण काम आहे आणि यावर उपाय शोधण्याचा आग्रह धरला. उंच इमारतींमधील आग विझवण्यासाठी आमच्या अग्निशमन दलाचे कौशल्य सतत वाढवण्यावर पंतप्रधानांनी भर दिला आणि त्याचबरोबर औद्योगिक आग विझवण्यासाठी पुरेशी संसाधने आहेत याची खात्री करून घेतली. बचत गटांच्या महिलांना त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि आगीच्या घटना कमी करण्यासाठी वन इंधन जैवइंधनामध्ये बदलणारी उपकरणे उपलब्ध करून देण्याची शक्यता त्यांनी शोधण्यास सांगितले. गॅस गळतीची शक्यता जास्त असलेल्या उद्योगांसाठी आणि रुग्णालयांसाठी तज्ञांची फौज तयार करण्याबद्दलही त्यांनी सांगितले. ढिगाऱ्याखाली दबलेल्या लोकांना शोधण्यासाठी ड्रोन, अलर्टसाठी गॅझेट्स आणि वैयक्तिक गॅझेटचा वापर करण्याकडे लक्ष देण्यासही त्यांनी संबंधितांना सांगितले. त्यांनी तज्ञांना नवीन प्रणाली आणि तंत्रज्ञान तयार करणाऱ्या जागतिक सामाजिक संस्थांच्या कार्याचा अभ्यास करण्याची आणि सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करण्याची विनंती केली.[७]

**निष्कर्ष-** नेतृत्वाची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. राजकीय नेत्यांची आपत्ती व्यवस्थापनामधिल भूमिका अधिकारी वर्गावर प्रभाव निर्माण करते. हे दिसून आले. आपत्ती व्यवस्थापनात उत्कृष्ठ नेतृत्त्व लाभले तरच आपत्तीवर नियंत्रण मिळविता येते. नेतृत्त्वाच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे आणि योग्य संचालनामुळे सर्वांची कार्यक्षमता वाढते. तसचे आपत्तीच्या विविध कार्यात एकसूत्रता निर्माण होते; सर्वांचे सहकार्य लाभते, सर्वांना प्रेरणा मिळते, आपत्ती ग्रस्तांचे हित जोपासले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका अतिशय प्रेरणादाई आहे.नेतृत्व सर्व गुण संपन्न असले तर व्यवस्थापन चांगले होते हे

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
*E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume I*

दिसून आले. राजकीय नेतृत्वाची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका महत्त्वाची असते. नरेंद्र मोदी यांनीही आपत्ती व्यवस्थापनात खूप चांगली भूमिका बजावली आहे. त्यामुळेच भारताच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांसाठी जगातील १०० हून अधिक देश सामील झाले आहेत.

**References**

1. चौधरी ए. पी.,चौधरी अर्चना (२०१२) "आपत्ती व्यवस्थापन" प्रशांत पब्लिकेशन,जळगाव . पा. ९,१७४,२२३
2. Bennis, W. (1959). "Leadership Theory and Administrative Behavior." Administrative Science Quarterly, 4(3), 259-301.
3. McGregor, D. (1960). "The Human Side of Enterprise." McGraw-Hill.
4. Stogdill, R. (1974). "Handbook of Leadership: A Survey of Theory and Research." Free Pres
5. www.news18.com/india/when-29-year-old-narendra-modi-took-part-in-rescue-operation-during-the-1979-morbi-tragedy-8700511.html
6. www. republicworld.com/ india/ dreams-from-debris
7. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचे भाषण 10.03.2023. आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी राष्ट्रीय व्यासपीठ (NPDRR) च्या तिसऱ्या सत्राचे नवी दिल्ली येथे उद्घाटन केले.